प्रेसनोट

दिनांक २१/११/२०१८

**पोलीस ठाणे शिवाजीनगर नांदेड येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक, सुनिल बाजीराव लहाणे, व पोलीस हवालदार केशव केरबा हाके, यांनी २५,०००/—रु. लाचेची मागणी केल्या बाबत नांदेड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून गुन्हा दाखल करण्यात आला**

यातील तक्रारदार यांनी दिनांक १४/११/२०१८ रोजी कार्यालय पोलीस उप अधिक्षक, लाचलूपत प्रतिबंधक विभाग नांदेड येथे तक्रार दिली की, " त्यांचे भावा विरूध्द दाखल असलेल्या गुन्हयात पी.सी.आर. दरम्यान भावास चांगली वागणुक देण्यासाठी व कलम ३०७ भादवि कमी करुन कलम ३२४ लावण्यासाठी सहाय्यक पोलीस निरीक्षक लहाने यांनी ५०,०००/—रू. ची लाचेची मागणी करीत असल्याची तक्रार दिली".

सदर तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड कार्यालयाकडुन दिनांक १६/११/२०१८ रोजी शिवाजीनगर पोलीस स्टेशन परिसरात पंचासमक्ष केलेल्या लाच मागणी पडताळणी मध्ये तक्रारदाराचे नमुद कामासाठी सहाय्यक पोलीस निरीक्षक लहाने यांनी तक्रारदर यांचेकडे ५०,०००/—रुपये लाचेची मागणी करून तडजोडीअंति २५,०००/—रू. लाच स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. तसेच पोलीस जमादार हाके यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक लहाने यांना तक्रदारास लाच देण्यास प्रोत्साहित केल्याचे निष्पन्न झाले म्हणुन सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनिल बाजीराव लहाने व पोलीस जमादार केशव केरबा हाके, बक्कल क्रंमाक १७८४ यांचे विरूध्द पो.स्टे. शिवाजीनगर, जि.नांदेड, गु.र.न. २९७/२०१८ कलम ७ (अ), १२ भ्रष्टाचार प्रतिबंध (सुधारणा) अधिनियम — २०१८ भ्रष्टाचार प्रतिबंध (संशोधन) अधिनियम २०१८ नुसार गुन्हा दाखल करून तपास पोलीस निरीक्षक श्री बाबासाहेब काकडे लाचलूचपत प्रतिबंधक विभाग नांदेड हे करीत आहेत.

तरी सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणीचे मोबाईल फोनवर लोकसेवक यांचे एसएमएस किंवा व्हिडीओ, ऑडीओ क्लिप असल्यास, भ्रष्टाचार संबधाने कांही माहिती असल्यास किंवा माहिती अधिकारात शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी शासकीय निधीचा भ्रष्टाचार केला असेल तर खालील क्रंमाकावर संपर्क करावा.

१) टोलफ्री हेल्पलाईन क्रंमाक :— १०६४ (२) कार्यालयाचा फोन क्रंमाक ०२४६२—२५३५१२

३) श्री विजय डोंगरे, पो.उप अधि.यांचा मोबाईल क्रंमाक ८९७५७६९९९८

Website :- www.acbmaharashtra.gov.in, Mobile App :- www.acbmaharashtra.net

Facebook Page :- www.facebook.com/MaharashtraACB

( विजय डोंगरे )

पोलीस उप अधिक्षक,

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड.

कार्यालय पोलीस उप अधिक्षक ला.प्र.वि.नांदेड युनिट